# जपानी पुष्परचना - भाग ७

गेली ५-६ महिने आपण अनेक प्रकारच्या मुक्तरचना पहिल्या. त्यामध्ये आपल्या मनात जो विचार, कल्पना असेल त्याप्रमाणे रचनेची मांडणी पाहिली. एखादा विषय घेऊन केलेल्या रचना पाहिल्या, किंवा उपलब्ध असणाऱ्या पानांफुलांच्या कमीतकमी वापरातून, केलेल्या रचनाही पाहिल्या. यावेळी आपण इकेनोबो स्कूलमधील 'मोरिबाना' या अभिजात रचनांची माहिती घेणार आहोत.

रिक्का, शोका, नॅगेरी, मोरीबाना असे इकेनोबो स्कूलच्या अभिजात रचनांचे मुख्य प्रकार आहेत. मोरिबाना रचना या थोड्या मुक्त रचनांकडे झुकणाऱ्या आहेत. जपानमध्ये कुटुंब संस्थेला खूप महत्व आहे. कुटुंबाचे प्रमुख घटक म्हणजे आई, वडील आणि त्यांची मुले. हे तीन घटक या रचनांमध्ये शिन (Main Branch), सोय (Secondary branch) आणि ताय (Delicate small Branch) म्हणून लावले जातात. प्रत्येक फांदीची किंवा फुलाची उंची किती घ्यायची यासंबंधी काही नियम आहेत. या  तीन फांद्या / फुले लावली की रचना पूर्ण होत नाही. आपल्या कुटुंबामध्ये इतर जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी यांचा समावेश असतो. त्यांचे अस्तित्व आणखी काही पाने, फुले वापरून दाखविले जाते. त्याला 'अशिराय' असे म्हणतात. थोडक्यात सांगायचे तर या मोरीबाना रचनांमधून माणसांमधील नात्यांच्या आणि मैत्रीच्या ओलाव्याने भरलेल्या कुटुंबाचे प्रतिनिधित्व दिसते.

निवड करताना पाना-फुलांचे नैसर्गिक सौंदर्य राहील याची काळजी घेतली जाते. सरळ फांद्या, सुरेख वळणदार डौलदार फांद्या, वेली असे अनेक प्रकारचे साहित्य वापरले जाते. फांद्यांच्या फुलांच्या नैसर्गिक स्वभावानुसार मोरीबाना रचनांचे काही उपप्रकार सुद्धा आहेत.

रचना १ मध्ये सरळ जाणाऱ्या कामिनीच्या फांद्या शिन व सोय म्हणून वापरल्या आहेत. डावीकडे मोठे पांढऱ्या शेवंतीचे फुल ताय म्हणून वापरले आहे. जांभळी फुले व इतर शेवंतीची फुले 'अशिराय' म्हणून काम करतात.



रचना २ मध्ये कुंदाच्या डौलदार थोड्या झुकणाऱ्या फांद्या व गुलाबी रंगाचे गुलाब वापरले आहेत. कुंदाच्या फांद्या शिन आणि सोय म्हणून वापरल्या आहेत तर गुलाब गोल्डन रॉड व कुंदाच्या छोट्या फांद्या अशिराय म्हणून वापरल्या आहेत.




रचना ३ मध्ये शतावरीची ( Asparagus ) वेलाची ( Cascading Material ) खालच्या बाजूला झुकणारी फांदी शिन म्हणून वापरली आहे. पिवळा उंच जर्बेरा सोय आहे. पुन्हा पुढे डावीकडे दुसरा जर्बेरा ताय म्हणून वापरली आहे. गुलाब व त्यापुढे लावलेले Syngonium ( Arrow-Head ) चे पान हे सर्व अशिराय म्हणून वापरले आहे. रंगसंगती छान जुळून आली आहे.




**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
( M.Sc. M.Phil Chemistry)
व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो इकेबाना पुणे शाखा.
email : asdssd@gmail.com